# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## मंगळवार, दिनांक १८ जून, २०१९/ जेष्ठ २८, १९४१ (शके)

**६३** महाराष्ट्र विधानसभा नियम १०६ (३) प्रमाणे बॅलटव्दारे काढण्यात आलेल्या आणि शुक्रवार, दिनांक २१ जून, २०१९ रोजी सभागृहात चर्चेसाठी घेण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांच्या सूचना देणाऱ्या सदस्यांची क्रमवार सूची खालीलप्रमाणे आहे.

(1) **डॉ. सतीश पाटील, वि.स.स. यांचा ठराव क्र. ८२**

"राज्यात उद्योग जगतात मोठया प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(2) **श्री. कालीदास कोळंबकर, वि.स.स. यांचा ठराव क्र. ३५९**

"राज्यात रस्ते अपघातात ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, अपघातग्रस्तांना वेळीच योग्य उपचार मिळावेत म्हणून मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-गोवा (वडखळ नाका), नाशिक-शिर्डी, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे या सारख्या जास्त वाहनांची वर्दळ असलेल्या द्रुतगती मार्गावर शासनाने ट्रॉमा केअर सेंटर सुरु करावेत तसेच मुंबई-पुणे राष्ट्रीय मार्गावर चौक लोधिवली (ता.खालापूर, जि.रायगड) येथे अद्ययावत असलेल्या जे.एच.अंबानी हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय सेवा २४ तास देण्याची व्यवस्था करणे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे ."

(3) **श्री.राजेश काशीवार, वि.स.स. यांचा ठराव क्र. ३११**

''राज्यातील खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पिछेहाट लक्षात घेता क्रिडा क्षेत्राचा सर्वांगिण विकास होण्याकरिता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुका स्तरावर क्रिडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमून आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस विधानसभा शासनास करीत आहे.''

(4) **श्री. अमीन पटेल, वि.स.स. यांचा ठराव क्र. १८०**

"राज्यातील विशेषत: मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनाच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास, परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(5) **श्री. सुभाष पाटील, वि.स.स. यांचा ठराव क्र. १४१**

"राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र विकसित करण्याबाबत तसेच त्याठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यकत्या सोई सुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**जितेंद्र भोळे**
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : १८ जून, २०१९

**याची प्रत:**

1. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व मा.सदस्य.
2. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.
3. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
4. संगणक कक्ष (website)